दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

www.raigadnagari.com
/ raigadnagari

वर्ष २० वे | अंक २६५ | MAHMAR/2006/17212 | रायगड | मंगळवार, दि.२३ डिसेंबर २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

## मांदाटणे येथे बंद फार्महाऊस फोडून चोरी

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा शहरानजीक मांदाटणे गावातील आंबा बागायतीतील बंद फार्महाऊसवर चोरट्यांनी डल्ला मारल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.या प्रकरणी फार्महाऊसचे मालक ईशान यादव यांनी दिलेल्या फिर्यादीवरून म्हसळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चोरट्यांनी फार्महाऊस चा कडी-कोयंडा तोडून प्रवेश करत घरातील फर्निचर, कुकिंग सिस्टीम, भांडी, सिलिंग फॅन, गिझर,सीसीटीव्ही कॅमेरे यांसह मौल्यवान साहित्य लंपास केले आहे.घटनेची माहिती मिळताच फॉरेन्सिक व्हॅन आणि डॉग स्क्वॉडच्या मदतीने तपास सुरू करण्यात आला. म्हसळा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रविंद्र पारखे यांनी घटनास्थळी तात्काळ भेट देऊन पाहणी केली.चोरीचा पुढील तपास अमलदार पी. बी. सुर्वे करत असून चोरट्यांचा शोध घेण्यासाठी पोलीस विविध अंगाने तपास करत आहेत.



# ठाकरे बंधू एकत्रच युतीची घोषणा करणार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या दृष्टीने ठाकरे बंधू एकत्र येत निवडणुकीच्या दृष्टीने युतीची घोषणा कधी करणार? याची उत्सुकता सर्वांना लागून राहिलेली आहे. वरळी डोम येथे झालेल्या कार्यक्रमानंतर ठाकरे बंधूंच्या मनोमिलनाची चर्चा जोरात सुरु आहे. मात्र अधिकृतरित्या दोन्ही ठाकरे बंधूंच्या युतीची घोषणा झाली नसल्याने शिवसैनिक आणि मनसैनिकाला संभ्रम आहे. बीएमसी निवडणूक संदर्भात युतीच्या घोषणेची प्रतीक्षा येत्या काही तासांत संपण्याची चिन्हे आहेत.**

आगामी एक-दोन दिवसांत युतीची अधिकृतरित्या घोषणा होईल अशी शक्यता शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि मनसेतील दुसऱ्या फळीतील नेत्यांनी व्यक्त केलेली आहे. ठाकरे गटाचे नेते अनिल परब आणि संजय राऊत यांनी तसे अनौपचारिक संकेत दिले आहेत. मनसेतील नेत्यांनी यासंदर्भात अधिकृतरित्या काही बोलत नसले तरी तशी शक्यता व्यक्त केलेली आहे. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्रितरीत्या पत्रकार परिषद घेऊन युतीचा नारळ फोडतील अशी माहिती मिळत आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेची निवडणूकदोन्ही ठाकरे बंधूंकरिता अस्तित्वाची लढाई समजली जाते आहे. कालच नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या निकालात भाजप आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेना सरस ठरलेली पाहायला मिळाली. विधानसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीमार्फत उमेदवार निश्चितीमध्ये झालेली दिरंगाई पाहता दोन्ही ठाकरे बंधू युतीची घोषणा करून काही उमेदवारांच्या नावांची घोषणा करतील अशी पण शक्यता विश्वसनीय सुत्रांनी सांगितलेली आहे.

नगरपंचायत आणि नगरपरिषदांच्या निवडणूक निकालांमध्ये भाजप आणि शिवसेनेचे वाढलेले बळ पाहता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पार्श्वभूमीवर ठाकरे बंधूंच्या युतीची घोषणा मनसैनिक आणि शिवसैनिकांच्या उत्साहात संचार वाढायला मदत करेल, असं म्हटलं जात आहे.

'मनसेशी युतीबाबत दोन्ही पक्षांच्या नेत्यांची रविवारी बैठक झाली असून या बैठकीत चर्चा पूर्ण झाली आहे. चर्चा व जागावाटप संपले आहे. कुणी कुठे लढायचे यावर एकमत झाले. कोणतीही अडचण दिसत नाही. येत्या एक-दोन दिवसांत यासंबंधीची रितसर घोषणा होईल', असे ते म्हणाले.

### 'मन वळविण्याचे प्रयत्न'

'महापालिका व जिल्हा परिषदेच्या निवडणुका एकत्र लढावे अशी आमची व काँग्रेसची इच्छा आहे. परंतु त्यांच्या काही अडचणी आहेत. विशेषतः राज ठाकरे यांच्या संदर्भात. आम्ही त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला की, भाजपचा पराभव करण्यासाठी सर्व घटक एकत्र घ्यावे लागतील. काँग्रेसचे मन वळवण्याचे प्रयत्न अजूनही सुरू आहेत. अजून ७२ तास आहेत. परंतु आमच्यात कोणतीही कटुता नाही', असे त्यांनी स्पष्ट केले.

## सुप्रीम कोर्टाचा आ.माणिकराव कोकाटेंना दिलासा, आमदारकी वाचली

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राष्ट्रवादीचे (अजित पवार गट) आमदार तथा माजी मंत्री माणिकराव कोकाटे यांना सुप्रीम कोर्टाने मोठा दिलासा दिला आहे. मुंबई हायकोर्टाच्या अंतरिम आदेशाला सुप्रीम कोर्टाने स्थगिती दिली आहे, त्यामुळे कोकाटे यांची आमदारकी मात्र वाचली आहे. सुप्रीम कोर्टाची नाताळ सुट्टी सुरू झाली असताना सरन्यायाधीशांच्या नेतृत्वाखालील विशेष खंडपीठासमोर आज तातडीच्या प्रकरणांवर सुनावणी होत आहे. त्यात कोकाटे यांच्या अर्जावरही होणार सुनावणी झाली आहे.



'आमदार म्हणून अपात्र ठरणार नाहीत, एवढ्यापुरतेच आम्ही हायकोर्टाच्या आदेशाला तूर्तास स्थगिती देत आहोत. पण माणिकराव कोकाटे यांना कोणत्याही लाभाचे पद धारण करता येणार नाही', असं सुप्रीम कोर्टाने आपल्या आदेशात स्पष्ट केलं आहे. कोकाटे यांच्या अर्जावर प्रतिवादींना नोटीस जारी करून सुप्रीम कोर्टाने सुनावणी तहकूब केली. ज्यांच्या तक्रारीवरून उपजिल्हाधिकाऱ्यांनी पोलिसांत एफआयआर नोंदवला, त्यांच्या वकिलांनी हस्तक्षेप करून कोकाटे यांना दिलासा मिळू नये, असा प्रयत्न केला.

मात्र, 'प्रथमदर्शनी कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयात मूलभूत चूक दिसत आहे. सविस्तर सुनावणीत सर्व बाबींचा कायदेशीर विचार केला जाईल', असं स्पष्ट करून सरन्यायाधीश सूर्यकांत व न्यायमूर्ती जॉयमल्या बागची यांच्या खंडपीठाने कोकाटे यांना दिलासा दिला आहे.

## नवी मुंबई विमानतळासाठी आता नवे रेल्वे स्थानक

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे विमान वाहतूक सेवेत महत्वाची भूमिका बजावणार आहे. या विमानतळामुळे नवी मुंबई परिसरात अनेक उद्योग, व्यवसायांना चालना मिळण्याची शक्यता आहे. असे असतानाच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे जाणाऱ्या प्रवाशांसाठी महत्वाची पायाभूत सुविधा उपलब्ध झाली आहे. नवी मुंबई बेलापूर नेरूळ उरण रेल्वे मार्गावर एका नव्या रेल्वे स्थानकाची उभारणी करण्यात आली आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पार पडले. येत्या २५ डिसेंबर पासून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर उड्डाण सेवा सुरू होणार आहे. या विमानतळावर जाण्याकरिता प्रवाशांना सुलभ व्हावे याकरिता नवे रेल्वे स्थानक तयार करण्यात आले आहे. बेलापूर-नेरूळ-उरण रेल्वे मार्गावर 'तारघर' हे नवे रेल्वे स्थानक कार्यान्वित करण्यात आले आहे. सुमारे १०० कोटी रुपये खर्चून उभारलेलं हे स्थानक भविष्यात विमानतळ प्रवाशांसाठी प्रमुख रेल्वे मार्ग ठरण्याची शक्यता आहे.

तारघर रेल्वे स्थानक हे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या अगदी जवळ असणारे स्थानक आहे.




विमानतळ सुरू झाल्यानंतर या परिसरात प्रवासी, व्यावसायिक वसाहती आणि लोकसंख्येत लक्षणीय वाढ होण्याचा शक्यता आहे. या दृष्टीने विचार करता रेल्वे प्रशासनाने हे स्थानक उभारले आहे.

उरण मार्गावरील रेल्वे प्रवासाला या स्थानकामुळे नवे महत्त्व प्राप्त झालं आहे. कामोठे, उलवे, बामणडोंगरी परिसरातील रहिवाशांना थेट रेल्वे सेवेचा लाभ मिळणार आहे.

यासोबतच बेलापूर-नेरूळ-उरण मार्गावरील लोकल फेऱ्यांमध्ये वाढ करण्यात आली असून, त्यामुळे सकाळ आणि सायंकाळच्या वेळी गर्दी कमी होण्यास मदत होणार आहे.

अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज असलेल्या तारघर स्थानकावर प्रशस्त फलाट, सुरक्षित प्रवेश-निर्गमन व्यवस्था असणार आहे. भविष्यातील प्रवाशांची संख्या लक्षात घेऊन स्थानकाचं नियोजन करण्यात आले आहे. हे स्थानक केवळ रेल्वे वाहतुकीपुरते मर्यादित राहणार नसून नवी मुंबईच्या सर्वांगीण विकासातील महत्त्वाचा टप्पा ठरेल, असे मत व्यक्त होताना दिसत आहे.

## हुकूमशाहीविरोधात आगामी लढ्यासाठी सज्ज व्हा : जयंत पाटील




**दै.रायगड नगरी । रत्नाकर पाटील**

**अलिबाग ।** अलिबाग नगरपरिषदेच्या निवडणूकीत तीन उमेदवार वगळता महाविकास आघाडीतील शेकाप व काँग्रेसला चांगले यश मिळाले. निवडणूकीचा निकाल समाधानकारक आहे. या निवडणुकीनंतर महाविकास आघाडीत एक परिवर्तन झाले आहे. नगराध्यक्ष उच्च शिक्षित असून अनेक भाषांवर प्रभूत्व असणारी आहे. ती चांगले काम करणारी नगराध्यक्ष आहे. शेतकरी कामगार पक्षाची बांधिलकी गोरगरीब, कष्टकऱ्यांसोबत आहे. त्यांना केंद्रबिंदू ठेवून शेकापने काम केले आहे. आपण जनतेचे सेवक आहोत, या भावनेतून काम करायचे आहे. संविधान तसेच लोकशाही जगली पाहिजे, यासाठी महाविकास आघाडी निर्माण करण्यात आली आहे. आगामी जिल्हा परिषदेच्या निवडणूकीत एकत्र येऊन मोठ्या ताकदीने लढण्यासाठी सज्ज व्हा, असे आवाहन शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी केले.

यापुढे मार्गदर्शन करताना जयंत पाटील म्हणाले की, प्रशांत नाईक यांनी अलिबाग नगरपालिका चांगल्या पध्दतीने सांभाळली आहे. नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत त्यांनी चांगले काम केले आहे. त्यांचे काम खऱ्या अर्थाने कौतूकास्पद आहे. आजचा वाढदिवस व सन्मान सोहळा हा कौटूंबिक असून या भव्यदिव्य सोहळ्यातील उपस्थिती पाहून भारावून गेलो आहे. अलिबाग नगरपरिषदेमध्ये तीन जागा गेल्याचे दुःख झाले असून खंतही वाटत आहे. याबाबत एकत्रित बसून आत्मपरिक्षण करण्याची गरज आहे. ज्या जागा गेल्या, त्या जातील अशी अपेक्षा नव्हती. आपण अलिबाग शहराचा चेहरा-मोहरा बदलण्याचे काम केले आहे. अधिक वेगळ्या पध्द-तीने अलिबागचा विकास करून शहराचा एक वेगळा कायापालट करण्याची भूमिका आहे. या निवडणूकीत आपल्याला ८२ टक्के मते पडली आहेत. यामध्ये सर्वात महत्वाचे म्हणजे नगराध्यक्षपदाच्या उमेदवार अक्षया नाईक यांना सर्वाधिक मते मिळाली आहेत. कमी वय असणारी राज्यातील पहिली नगराध्यक्ष म्हणून तिचा सन्मान होत आहे. अलिबाग शहरा-तील काही भागांमध्ये वाहतूक कोंडी होत आहे. ही कोंडी सोडविण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. पाणी प्रश्नदेखील सोडविला जाणार आहे. पर्यटन वाढीबरोबरच नागरिकीकरण देखील वाढत आहे. एमएमआरडीए अंतर्गत असणाऱ्या नगरपालिकांना मुंबईचा दर्जा मिळाला पाहिजे. त्या पध्दतीने काम होणे गरजेचे आहे, असे जयंत पाटील यांनी सांगितले. या वेळी अलिबाग नगरपरिषदेच्या निवडणुकीत विजयी झालेल्या नवनिर्वाचित नगराध्यक्षांसह नगरसेवकांचा शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला.

## पुढील आठवड्यात हुडहुडी कमी होणार



**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यभरात थंडीचा कडाका जाणवत असून नाताळच्या सुमारास हे प्रमाण कमी होईल, अशी शक्यता आहे. मुंबईमध्ये किमान तापमानाचा पारा रविवारी शनिवारपेक्षा थोडा वर होता. हा पारा सोमवारी आणखी वाढून दोन ते तीन दिवसांनी स्थिर राहण्याचा अंदाज आहे.

राज्यात दोन ते तीन दिवस शनिवार आणि रविवारी नोंदल्या गेलेल्या किमान तापमानापेक्षा चढे तापमान असू शकेल. दुपारीही निरभ्र आकाशामुळे सूर्यकिरणे थेट जमिनीवर पोहोचून कमाल तापमानाचाही चटका जाणवण्याची शक्यता आहे. मुंबईमध्ये सांताक्रूझ येथे १७.४, तर कुलाबा येथे २०.८ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली. रविवारी आणि सोमवारीही उत्तर मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी थंडीची लाट जाणवू शकते. याचा परिणाम उत्तर कोकणावर होतो.

नाशिक शहरातील किमान तापमानात २४ तासांमध्ये २.३ अंश सेल्सियसने वाढ झाली आहे. शनिवारी ७ अंश सेल्सियसच्या खाली घसरलेले किमान तापमान रविवारी सकाळी ९.२ अंश सेल्सियस नोंदवले गेले.

### पनवेल मतदार यादीतील घोळ चव्हाट्यावर...

## तोंडरे गावातील एका वडिलांना २६८ मुले?; याचिका दाखल होणार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेची निवडणूक प्रक्रिया सुरू असतानाच प्रभाग क्रमांक २ मधील अंतिम मतदार यादीत उघड झालेल्या धक्कादायक घोळामुळे शहरात मोठी खळबळ उडाली आहे. एका व्यक्तीच्या नावाखाली तब्बल २६८ मुलांची नोंद आढळून आल्याचा प्रकार समोर आल्यानंतर, या प्रकरणाला आता गंभीर वळण मिळाले असून शेतकरी कामगार पक्षाचे माजी नगरसेवक अरविंद म्हात्रे यांनी थेट उच्च न्यायालयात धाव घेत याचिका दाखल केली आहे.



महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवारांना नुकतीच अंतिम मतदार यादी उपलब्ध करून देण्यात आली. त्याच दरम्यान ही धक्कादायक बाब उघडकीस आली. एका वडिलांच्या नावाखाली असामान्य संख्येने मुलांची नोंद आढळल्याने मतदार यादीच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या संदर्भात उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेत अरविंद म्हात्रे यांनी नमूद केले आहे की, या २६८ नावांपैकी बहुसंख्य तरुण हे उत्तर प्रदेश व मध्य प्रदेशातील असून, संबंधित व्यक्ती प्रत्यक्षात पनवेलमध्ये वास्तव्यास नाहीत. तरीही त्यांची नावे एकाच पत्त्यावर मतदार म्हणून नोंदवण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. हा प्रकार केवळ प्रशासकीय चूक नसून, आगामी पनवेल महानगरपालिका निवडणुकीवर प्रभाव टाकण्यासाठी जाणीवपूर्वक करण्यात आलेला गंभीर गैरप्रकार असल्याचा दावा याचिकेत करण्यात आला आहे. याचिकेद्वारे अरविंद म्हात्रे यांनी उच्च न्यायालयाकडे संबंधित मतदार यादीची तातडीने सखोल आणि निष्पक्ष चौकशी करण्याचे आदेश द्यावेत, बनावट व संशयास्पद नोंदी तत्काळ रद्द कराव्यात, तसेच या प्रकरणास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर व संबंधितांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी केली आहे.

दरम्यान, पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १४ मधील अंतिम मतदारयादीतून पूर्वश्रीत १४०० मतद-ाराची नावे वगळण्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.निवडणुकीच्या तोंडावरच असा प्रकार उघडकीस आल्याने पनवेलमध्ये राजकीय वातावरण तापले असून, मतदार यादीसारख्या महत्त्वाच्या प्रक्रियेवर प्रशासनाचा कितपत ताबा आहे, याबाबत नागरिकांमध्ये तीव्र चर्चा सुरू आहे. लोकशाहीचा पाया मानल्या जाणाऱ्या मतदार यादीतच अशा स्वरूपाचा घोळ आढळणे ही अत्यंत गंभीर बाब असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. दोषींवर कारवाई होते का, याकडे संपूर्ण पनवेलचे लक्ष लागले आहे.

> एका वडिलांना २६८ मुले दाखवणे म्हणजे मतदार यादीची थट्टा असून लोकशाही प्रक्रियेचा थेट अपमान आहे. बाहेरील लोकांची नावे मतदार यादीत घालून निवडणुकीत गैरव्यवहार करण्याचा हा प्रयत्न आहे.
>
> **अरविंद म्हात्रे, याचिकाकर्ते**

# नगरांचा जनादेश सत्तेला

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील नगरपालिका व नगरपंचायतींच्या निवडणुकीत राज्य पातळीवरील बड्या नेत्यांनी त्यांचे बालेकिल्ले टिकवून ठेवले, तर काहींचे ढासळले. विशेषत: वर्षभरापूर्वी आमदारकी मिळविलेल्या काहींना धक्का बसला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपूरचा गड राखला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिंदेसेनेचा प्रभाव असलेले टापू जिंकलेच, शिवाय पूर्वी जिथे शिंदेसेनेचा खूप प्रभाव नव्हता, अशा राज्याच्या विविध भागांतील नगराध्यक्षपदे जिंकून विधानसभेतील यशाची पुनरावृत्ती केली, तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीने पुणे जिल्ह्याचा बालेकिल्ला सांभाळून ठेवला. उत्तर महाराष्ट्रातही बऱ्यापैकी यश मिळविले. काँग्रेसचे विधानसभेतील गटनेते विजय वडेट्टीवार यांनी चंद्रपूर जिल्ह्यात मोठे यश मिळविले, तर माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनी अमरावती जिल्ह्यात भाजपच्या वर्चस्वाला शह देण्याचा प्रयत्न केला. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ बुलढाण्याचे. त्यांच्या वऱ्हाडात काँग्रेसला थोडे का होईना यश मिळाले, हे महत्त्वाचे. महाराष्ट्राचा प्रदेशनिहाय विचार करता राज्याच्या सर्वच प्रदेशांमध्ये दणदणीत यश मिळविणारा भाजप हा एकमेव पक्ष ठरला, तर शिंदेसेनेने कोकणात व दक्षिण महाराष्ट्रात मुसंडी मारली. विदर्भाने पुन्हा एकदा प्रादेशिक पक्षांना दूर ठेवताना भाजप व काँग्रेस या राष्ट्रीय पक्षांवर विश्वास व्यक्त केला. मराठवाड्याने संमिश्र कौल दिला, तर उत्तर महाराष्ट्राने भाजपसोबत अजित पवारांच्या राष्ट्रवादीच्या झोळीत मतांचे दान टाकले. सत्ताधारी महायुतीचा विचार करता नगरपालिका व पंचायतींमधील यश किंवा अपयश हे पूर्णपणे पक्षांचे आहे. भाजप, शिंदेसेना व अजित पवारांची राष्ट्रवादी ही निवडणूक एकत्रितपणे लढली नाही. उलट शक्य तिथे एकमेकांच्या विरोधात दंड थोपटण्याची आणि त्यातून विरोधी महाविकास आघाडीकडे सरकारविरोधी मते जाऊ न देण्याची रणनीती अवलंबिण्यात आली. त्यामुळेच प्रचारादरम्यान तिन्ही पक्षांच्या नेत्यांनी एकमेकांविरुद्ध जहरी टीका केली. हा महायुतीमधील अंतर्गत वाद मतदारांना वाटले जाणारे एकमेकांचे पैसे पकडून देण्यापर्यंत पोहोचला. विशेषत: एकनाथ शिंदे व अजित पवारांच्या पक्षांनी एकमेकांना कोंडीत पकडण्याचा, शिवाय काही ठिकाणी दोघांपैकी कोणीतरी भाजपला घेरण्याचा प्रयत्न केला. याउलट पक्षफुटीने जर्जर झालेली उद्धवसेना आणि शरद पवारांची राष्ट्रवादी या स्थानिक पक्षांना जेमतेम यश मिळाले. हादेखील सत्तेचा परिणाम म्हणता येईल. स्थानिक स्वराज्य संस्थांचा कौल तसाही नेहमी सत्ताधारी पक्षांकडेच जातो, हा आतापर्यंतचा अनुभव आहे. हा निकालदेखील तसाच आहे. तरीदेखील या निवडणुका व निकाल, नऊ-दहा वर्षांनंतर झालेल्या निवडणुका, मतदार यादीतील घोळ, अनेक ठिकाणी निवडणूक पुढे ढकलण्याच्या निमित्ताने निवडणूक आयोगाची धरसोड वृत्ती, निकालाबाबत न्यायालयाचा हस्तक्षेप, तसेच निवडणुकीपूर्वी सत्ताधारी महायुतीच्या घटकपक्षांमध्ये विरोधी पक्षांच्या नेत्यांचा घाऊक प्रवेश, निवडणुकीत पैशाचा प्रचंड वापर अशा अनेक कारणांनी आठवणीत राहतील. हा पैसा काही ठिकाणी जिंकला तर काही ठिकाणी जनतेने पैशाचा वापर उधळून लावला. याच कारणाने विरोधकांच्या दृष्टीने ही सत्ता-पैसा विरुद्ध जनमताची लढाई होती आणि सत्ताधाऱ्यांना सिद्ध करायचे होते की, विधानसभेचे अभूतपूर्व यश हा निव्वळ योगायोग नव्हता. महाराष्ट्र विधानसभेच्या जागा २८८ आणि निवडणूक झालेल्या पालिका व पंचायतींची एकूण संख्याही २८८ या सांख्यिकी योगायोगाच्या पार्श्वभूमीवर या निकालाचा अर्थ स्पष्ट आहे - भाजप हाच राज्यातील क्रमांक एकचा पक्ष आहे. दुभंगलेली शिवसेना आणि दुभंगलेल्या राष्ट्रवादीच्या फुटीर गटांना पुन्हा मूळ गटांपेक्षा अधिक यश मिळाले आहे. मूळ पक्षातून बाहेर पडलेले गट सत्तेत असण्याचा हा परिणाम म्हणता येईल.काँग्रेस पक्ष राज्यात जिवंत आहे, हे या निकालाचे आणखी एक निरीक्षण. अर्थात, विदर्भाबाहेर उर्वरित महाराष्ट्रात काँग्रेसच्या नेत्यांनी पक्षचिन्हावर निवडणूक लढविण्याचे टाळले आणि त्यामुळे हा पक्ष प्रामुख्याने विदर्भामुळे जिवंत असल्याचे चित्र समोर आले. अर्थात, पालिका व पंचायतींची निवडणूक ही शहरी जनादेशाची सेमीफायनल आहे. राज्यातील २९ महापालिकांची निवडणूक ही त्याची फायनल असेल. त्या निवडणुकीची अधिसूचना परवा मंगळवारी, २३ डिसेंबरला निघेल. महापालिकांच्या रूपाने सत्ताधारी व विरोधी पक्षांपुढे नवे मैदान व नवे आव्हान असेल. ते पेलताना महायुती व महाविकास आघाडी पुन्हा स्वबळ अजमावतात की या निकालाचा संदेश घेऊन मैत्रीच्या प्रयत्नांना गती देतात, हे पाहावे लागेल.

# मतदान जागरूकतेच्या स्वीप कार्यक्रमांतर्गत चित्रकला स्पर्धा ; निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धांचे आयोजन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

महापालिका सार्वत्रिक निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांनी आपला मतदानाचा अधिकार बजावावा याकरिता जनजागृती करण्यासाठी आज दिनांक २२ डिसेंबर रोजी निवडणूक अधिकारी तथा आयुक्त श्री.मंगेश चितळे यांच्या सूचनेनूसार केएलई महाविद्यालय कळंबोली येथे विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

निवडणूक अधिकारी तथा आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार मतदान जनजागृतीसाठी महापालिकेच्या वतीने स्वीप (सिस्टेमॅटिक वोटर्स एज्युकेशन इलेक्ट्रोल पार्टिसिपेशन प्रोग्रॅम) कार्यक्रमचे आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये मतदान जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

यामध्ये केएलई महाविद्यालय कळंबोली येथे आज चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले, या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी निबंध लेखन स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा तसेच घोषवाक्य (स्लोगन) स्पर्धा अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये मतदानाबाबत जनजागृती निर्माण करण्यावर भर देण्यात आला.

महापालिका कार्यक्षेत्रात मतदानाची टक्केवारी वाढवावी यासाठी महापालिकेच्यावतीने स्वीप कार्यक्रमांतर्गत प्रभात फेरी, मॅरेथॉन, फ्लॅश मॉब, मास्कॉट्स, सेल्फी पॉईंटस,आईसी व्हॅन, जनजागृती केली जात आहे.

# पर्यावरण रक्षा -मानव सुरक्षा या विषयावर फॉन संस्थेतर्फे जनजागृती



**दै.रायगड नगरी । उरण**

कोकण ज्ञानपीठ कला व वाणिज्य महाविद्यालय, उरणच्या एनएसएस विभागाच्या श्रमसंस्कार शिबिर अंतर्गत कर्मवीर भाऊराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पिरकोन येथे फ्रेंड्स ऑफ नेचर ( फॉन) सर्पमित्र निसर्गसंवर्धन संस्था, चिरनेर-उरण, रायगड( महाराष्ट्र ) तर्फे पर्यावरण रक्षा -मानव सुरक्षा या विषयावर संस्थेचे संस्थापक अध्यक्ष जयवंत रामदास ठाकूर व सदस्य राकेश सुरेश शिंदे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

पर्यावरण व मानव-वन्यजीव संघर्ष तसेच सर्प ओळख,सर्पदंश कसे टाळावे व सर्पदंश झाल्यास काय करावे ? संस्थेच्या शून्य सर्पदंश मृत्यू अभियान आणि स्नेक बाईट ऍकशन टीम प्रकल्पाबद्दल जनजागृती केली. तसेच संस्थेचे सदस्य निकेतन रमेश ठाकूर यांनी सध्या महाराष्ट्रात सुरू असलेल्या मानव -बिबट संघर्ष, बिबटयाचे हल्ले वाढत आहेत त्याची कारणे व त्यावरील उपाययोजना याबाबत उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. दत्ता हिंगमिरे यांचीही यावेळी उपस्थिती लाभली होती.

# घटस्फोट घेतल्याचे सांगून महिलेची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

लग्न जुळवणाऱ्या साईटवर. घटस्फोटित असल्याची माहिती देऊन पनवेलमध्ये राहणाऱ्या व्यक्तीने अलिबाग परिसरात राहणाऱ्या एका महिलेला लग्नाची मागणी घालून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची घटना समोर आली. विशेष म्हणजे या व्यक्तीने पीडित महिलेची आर्थिक व भावनिक फसवणूक केल्याचे देखील उघडकीस आले. रोहन चिंतामण शिंदे (३८) असे त्याचे नाव असून खांदेश्वर पोलिसांनी त्याच्या विरोधात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपासासाठी पनवेल शहर पोलीस ठाण्याकडे वर्ग केला आहे.

रोहन शिंदे याने या लग्न जुळवणाऱ्या साईटच्या माध्यमातून पीडित महिलेच्या प्रोफाईलवर संपर्क साधत गोड बोलून तिचा विश्वास संपादन केला. त्यानंतर त्याने तिला लग्नाचे आमिष दाखवत गेल्या चार महिन्यात पनवेलमधील दोन लॉजमध्ये नेऊन तसेच तिच्या घरी जाऊन तिच्याशी जबरदस्तीने शारीरिक संबंध निर्माण केले. या कालावधीत त्याने पीडित महिलेच्या मोबाईलमध्ये लोन ॲप डाउनलोड करून तिच्या नावावर परस्पर कर्ज घेतले,एवढेत नव्हेतर सिनेमागृहात चित्रपट पाहत असताना तिच्या गळ्यातील सोनसाखळी काढून घेतल्याचे तपासात उघडकीस आले आहे. त्यानंतर रोहन याने त्याच्या पत्नीशी घटस्फोट घेतला नसल्याचे पीडित महिलेच्या लक्षात आले असता तिने खांदेश्वर पोलीस ठाण्यात रोहनविरोधात तक्रार दाखल केली.

त्यानुसार खांदेश्वर पोलिसांनी त्याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. मात्र गुन्ह्याचे घटनास्थळ पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीत येत असल्याने त्यांनी हा गुन्हा पनवेल शहर पोलिसांकडे वर्ग केला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

# निसर्ग सान्निध्यातील इतकी दर्जेदार शाळा पाहून मी धन्य झालो : डॉ चेतन सुर्वे

**दै.रायगड नगरी । निलेश लोखंडे**

**महाड ।** वलंग शिक्षण प्रसारक मंडळाचा ५६ वा वर्धापन दिन व न्यू इंग्लिश स्कूल वलंग विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन संस्थेचे अध्यक्ष अनंत रेवाळे यांच्या अध्यक्षतेखाली व उद्घाटक महाड मधील प्रसिद्ध समाजसेवक व वैद्यकीय क्षेत्रातील नामांकित डॉक्टर चेतन सुर्वे यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. संस्थेचे संस्थापक आदरणीय कै.महादेव धोंडू कुर्डुनकर गुरुजी व पहिले अध्यक्ष आदरणीय कै.ह भ प लक्ष्मण पांडुरंग बर्वे यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.



निसर्गाच्या सान्निध्यात इतकी गुणवंत आणि दर्जेदार शाळा पाहून मी सुखावलो. याआधीच मी इथे आलो असतो तर माझ्या हातून या शाळेसाठी चांगले सहकार्य करता आले असते,असे उद्गार उद्घाटक डॉ.चेतन सुर्वे यांनी काढून शाळेच्या सर्व उपक्रमांचे व मुख्याध्यापक कुर्डूनकर सर व सर्व कर्मचारी वृंदाचे कौतुक केले.

कुर्डूनकर सर हे माझे कॉलेजचे सर्वात हुशार जिवलग मित्र आहेत, त्यांची या स्वच्छ सुंदर शाळेला भेट दिल्याचा मला मनस्वी आनंद होत आहे,असेही ते म्हणाले.

सीएसआर फंडातून संस्थेच्या डॉ बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह व विद्यालयास सातत्याने तीन वर्षे भरीव आर्थिक सहाय्य करणाऱ्या सौ.सुप्रिया गणेश बेरे (बर्वे) यांच्या कृतज्ञता प्रीत्यर्थ लावलेल्या नामफलकाचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी काढलेल्या सुंदर रांगोळी वर्गखोलीचे उद्घाटन झाले. इयत्ता पाचवी ते दहावीच्या वर्गात उल्लेखनीय यश संपादन केलेल्या व वर्षभरातील स्पर्धेत पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यावेळी राष्ट्रीय आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार २०२५ प्राप्त झाल्याबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक मा.श्री.राजन महादेव कुर्डूनकर सर यांचा उपस्थितांच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला.

# महेंद्र चंदन यांची गटनेते पदी नियुक्ती

**दै.रायगड नगरी । संजय गायकवाड**

**कर्जत ।** कर्जत नगरपरिषदेची निवडणूक पार पडली. निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस - ठाकरे सेना परिवर्तन विकास आघाडी आणि भारतीय जनता पक्ष - शिंदे सेना - आरपीआय महायुतीमध्ये झालेल्या निवडणुकीत परिवर्तन विकास आघाडीने थेट नगराध्यक्षपदाची निवडणूक मोठ्या फरकाने जिंकली. एकवीस पैकी तेरा जागा जिंकून नगरपरिषदेत निर्विवाद सत्ता आणली. यामध्ये महेंद्र चंदन यांनी सर्वाधिक मताधिक्याने निवडणूक जिंकली. त्यांची कर्जत नगरपरिषदेचे गटनेते पदी नियुक्ती करण्यात आली.

काल निवडणुकीचे निकाल लागला आणि आज परिवर्तन विकास आघाडीचे नगराध्यक्ष व नगरसेवकांनी जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे यांच्या समवेत सुतारवाडी येथे जाऊन राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांची भेट घेतली. यामध्ये नगराध्यक्ष पुष्पा दगडे, संतोष पाटील, अंजली कडू, महेंद्र चंदन, सुमिता गायकवाड, राधिका पवार, प्रशांत पाटील, नेहा शिंदे, सुचिता खोत, कुमेश मोरे, हर्षला गायकवाड, अशोक राऊत, मानसी कानिटकर यांचा सहभाग होता. तटकरे यांनी सर्वांचे अभिनंदन केले. यावेळी सर्वात जास्त म्हणजे १०६७ मतांनी निवडून आलेल्या महेंद्र बबन चंदन यांची गट नेते पदी नियुक्ती करण्यात आली.

**दैनिक रायगड नगरी**
**बातम्या व जाहिरातींचे उत्तम माध्यम**
**संपर्क : ९६१९९७९७०६ / ९६१९७३७९११**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत अब्दुल रहिमान म. यूसुफ भाईजी यांच्या मालकी हक्क व कब्जेवहिवाटीचे असून आमचे अशिलांसोबत खालील नमूद मिळकत ही विक्री करणेकामी बोलणी चालू असून तत्पूर्वी कोणाची काही तक्रार, हरकत असल्यास ती समजणेकामी सदर नोटीस देणेत येत आहे.

खालील परिशिष्टात मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. असा भरवसा व खात्री विद्यमान मालकाने आमचे अशिलास दिलेली आहे. तथापि, सदरील मिळकतीवर विद्यमान मालकाचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, लीन, पोटगी, अन्न, वस्त्र, कोर्टवाद, चार्ज, वाटप, दावा, वारसाहक्क, मृत्यूपत्र, वहिवाट, अदलाबदल, करार, खरेदीखत, मुखत्यारपत्र, विरोधी कब्जा अगर तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध वगैरे असल्यास सबंधितांनी सदरील नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत मूळ कागदपत्रांनिशी आमचे खालील पत्त्यावर येऊन खात्री द्यावी. सदर मुदतीमध्ये हरकत न आल्यास खालील परिशिष्टातील मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. कोणाचेही कोणत्याही प्रकारचा काही एक, अधिकार व हितसंबंध नाही. असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशील ठरलेप्रमाणे पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकत विचारात घेतली जाणार नाही.

परिशिष्ट :- तुकडी रायगड, पोटतुकडी तालुका उरण, मे. दुय्यम निबंधक, उरण, रायगड, जिल्हा. रायगड तसेच जिल्हा परिषद रायगड, हद्दीतील मौजे पुनाडे, येथील मिळकत भूमापन /सर्व्हे नं. १४४/४२ यांसी एकूण क्षेत्र ०.२०.५० (हे.आर.प्र.) व पोटखराबा ०.००.०० (हे.आर.प्र.), आकार रक्कम रुपये ०.०० पैसे. यांसी चतु:सीमा वहिवाटीप्रमाणे आहेत.

यांसी चतु:सीमा वहिवाटीप्रमाणे आहेत. येणेप्रमाणे वर्णनात्मक जमीन, जोडहक्क, अधिकार व हितसंबंधासहित दरोबस्त.

रायगड, तारीख: २३ मार्च २०२५

सही/-
**श्री. विनायक र. ताम्हणकर, वकिल**
**खरेदीदारातर्फे वकिल**
**३०२, जय आशापुरा रेसिडेन्सी, शनी नगर, मांजर्ली, बदलापूर (प.) ४२१५०३**
**भ्रमणध्वनी क्र. ८६६८५५१३१२**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते कि, आमचे अशिल मे. ओम गुनिना व्हेंचर्स तर्फे भागीदार १ श्री. कल्पेश प्रेमचंद पटेल २.श्री. भावेश प्रेमचंद पटेल ३. श्री. विशाल तानाजीराव बीरादार ४. श्री. करण प्रल्हाद शिंदे ५. प्रविण कुमार नयागम पिल्लई हे खालील मिळाकत मेसर्स भक्ती लाईफस्पेसेस एलएलपी तर्फे भागीदार श्री. विशाल मनजी पटेल व इतर ४, पत्ता सदनिका क्र. १५०४, अन्टॉप टॉवर, प्लॉट नं. १२ व १३. सेक्टर १९, रामशेठ ठाकूर कॉलेज जवळ, खारघर, नवी मुंबई ४१०२१०. यांचे कडुन कायम स्वरुपी खरेदी खताने विकत घेत आहेत. व सदर मिळकत स्वतच्या नावे त्रिपक्षीय करारा द्वारे हस्तांतरण करुन घेत आहेत. सदर मिळकत आमच्या अशिलांच्या मालकीची आहे.

**मिळकतीचे वर्णन: संचिका क्र. १४१७, उलवे, सेक्टर १७, प्लॉट नं. १७८ए, क्षेत्रफळ -७९९.५१ चौ.मी. पैकी ५० टक्के ३९९.७५५ चौ.मी.**

तरी वरील मिळकती बाबत अन्य कोणाचाही हक्क, हितसंबध, कुळवहिवाट, ताबा, साठे करार, इंजमेट, फरोक्त, बोजा दान, गहाण, सरकारी, निमसरकारी, कंपनी, बक्षीस, भाडेपट्टा, वारसा हक्क, लोन, असे कोणाही व्यक्ती/संस्थाचे हक्क, हितसंबध, तसेच कुठल्याही प्रकारचे प्रलंबित दावे मे न्यायालयीन तसेच उच्च, कनिष्ठ न्यायालयीन दावे, हरकती किंवा इतर काही असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन १५ दिवसाच्या आत कागद पत्रासहित खालील पत्यावर समक्ष भेटावे.

दिनांक : २२/१२/२०२५
ठिकाण : नवी मुंबई

सही/-
**सौ. रेखा किशोर होवाळे**
**शॉप नं. १३, प्रभात सेंटर, से-१**
**सीबीडी बेलापुर नवी मुंबई**
**मो.नं.८३६९०१७३६३**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल प्रभाकर रमेश मोकल, रा.चिरनेर, ता.उरण, जि.रायगड यांच्या वडिलोपार्जित मालकीची, एकत्र कुटुंबांची, ताबेकब्जातील, अविभाज्य हिस्सा असणारी खालील वर्णनाची मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| दिघाटी, ता.पनवेल जि.रायगड | ७६ | १/६/ब/१ | ०.४४.२० पो.ख. ०.०२.१५ एकूण ०.४६.३५ | ५.७० |

सदर मिळकतीमध्ये आमचे अशिलांचा वारसा हक्काने जन्मजात अविभाज्य हिस्सा असून वरील मिळकती संदर्भात आमचे अशिलांनी दिवाणी न्यायाधिश व.स्तर पनवेल यांच्या न्यायालयात वाटपाकरिता रे.मु.नं.२३९/२०२४ दाखल केला असून सदरचा दावा मे.न्यायालयात प्रलंबित आहे. तरी सदरहू दावा मिळकती संदर्भात कोणीही विक्री, दान, गहाण, भाडेकरार, विकसाचा करार, गहाण खत, तत्सम प्रकारचे दस्त करू नये. अशा प्रकारचा कोणताही दस्त आमचे अशिलांच्या अपरोक्ष नोंदविण्यास आल्यास सदरचा दस्त आमचे अशिलांच्या हिश्श्यावर बंधनकारक राहणार नाही, कळावे.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २२/१२/२०२५

सही/-
**ॲड.सुमित ए. म्हात्रे**
**पायोनिअर को.ऑप.हौ.सो., अे विंग, पहिला मजला, फ्लॅट नं.१०४, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

## जाहीर नोटीस

या नोटीस द्वारे तमाम जनतेस कळविणयात येते कि, आमचे अशिल मे धर्ती इन्फ्रा तर्फे भागिदार (१) श्री शैलेश तेजा गामी (२) श्री दिनेश लिरा पटेल (३) श्री भरतकुमार भवन पटेल (४) श्री दिलीप गेलजी बार्वडिया ऑफिस पत्ता: शॉप नं ०२, धर्ती कॉर्नर, भुखंड क्र, १५८, सेक्टर-२६, उलवे, ता-पनवेल, जिल्हा रायगड हे खालिल वर्णनाची मिळकत श्री. सुरजीत आईल्सीघानी पत्ता- शिवओहम, प्लॉट नं. १३१ए, से-११, वाशी, नवी मुंबई, यांचे कडुन कायम स्वरुपी विकत घेत आहेत.

**मिळकतीचे वर्णन: मौजे : रोडपाली नोड-कळंबोली ता.पनवेल, जि.रायगड**

| गाव | नोड | भूखंड क्रं. | सेक्टर नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| मौजे : रोडपाली | नोड : कळंबोली | ९१ | १६ इ | ९३६.०५८ चौ.मी. |

तरी वरील मिळकती बाबत अन्य कोणाचाही हक्क, हितसंबध, कुळवहिवाट, ताबा, साठे करार, इंजमेट, फरोक्त, बोजा दान, गहाण, सरकारी, निमसरकारी, कंपनी, बक्षीस, भाडेपट्टा, वारसा हक्क, लोन, असे कोणाही व्यक्ती/संस्थाचे हक्क, हितसंबध, तसेच कुठल्याही प्रकारचे प्रलंबित दावे मे न्यायालयीन तसेच उच्च, कनिष्ठ न्यायालयीन दावे, हरकती किंवा इतर काही असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन १५ दिवसाच्या आत कागद पत्रासहित खालील पत्यावर समक्ष भेटावे.

दिनांक : २२/१२/२०२५
ठिकाण : नवी मुंबई

सही/-
**सौ. रेखा किशोर होवाळे**
**शॉप नं. १३, प्रभात सेंटर, से-१**
**सीबीडी बेलापुर नवी मुंबई**
**मो.नं.८३६९०१७३६३**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# वातावरणपूरक भात वाण निर्मितीने अन्नसुरक्षा, पोषणसुरक्षेस बळकटी : कुलगुरू डॉ. संजय भावे



**दै.रायगड नगरी । कर्जत**

प्रादेशिक कृषी संशोधन केंद्रात नव्याने सुरू होणाऱ्या गतिमान भात पैदास तंत्रज्ञान प्रकल्पामुळे देशाच्या अन्नसुरक्षेसह नागरिकांच्या पोषणसुरक्षेस बळकटी मिळेल,असा विश्वास डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय भावे यांनी आज येथे व्यक्त केला.संशोधन केंद्राच्या विविध प्रक्षेत्र व प्रयोगशाळांना भेट दिल्यावर शास्त्रज्ञांशी संवाद साधताना ते बोलत होते.

यावेळी डॉ. भावे यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थेसोबतच्या प्रकल्पांचा तसेच विकासात्मक बाबींचा आढावा घेतला.संशोधन केंद्र जागतिक दर्जाचे होण्यासाठी सर्वच प्रकल्पांना आवश्यक निधी व तांत्रिक मनुष्यबळ वेळेवर उपलब्ध करून दिले जाईल ,अशी ग्वाही त्यांनी शास्त्रज्ञांशी चर्चा करताना दिली. संशोधन केंद्राची मुख्य इमारत १०६ वर्षांपूर्वीची असल्याने ती ' वारसा ' म्हणून जतन करण्याची गरज त्यांनी प्रतिपादित केली.जीवनात वक्तशीरपणा फार महत्त्वाचा असून सर्वांनीच वेळेचे कसोशीने पालन करावे, असा सल्ला त्यांनी दिला.संशोधन केंद्राचा चेहरामोहरा झपाट्याने बदलत असल्याबद्दल त्यांनी गौरवोद्गार काढले.

यावेळी कुलगुरूंच्या सुविद्य पत्नी स्नेहल भावे,सहयोगी संशोधन संचालक डॉ. भरत वाघमोडे,कृषी विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने,सहा. भात पैदासकार डॉ. महेंद्र गवई,वनस्पती शरीरक्रिया शास्त्रज्ञ डॉ.मीनाक्षी केळुस्कर,मृदा शास्त्रज्ञ डॉ.देवदत्त जोंधळे,कनिष्ठ संशोधन सहायक डॉ. राजेंद्र सावळे प्रामुख्याने उपस्थित होते.

# राजमाता अहिल्याबाई सेवा संस्था, कामोठे वतीने 'खेळ पैठणीचा' या उपक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद




**दै.रायगड नगरी । पनवेल**

राजमाता अहिल्याबाई सेवा संस्था, कामोठे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या हळदी-कुंकू समारंभासह 'खेळ पैठणीचा' या उपक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. महिलांचा उत्साह, संस्कृतीचे जतन आणि सामाजिक ऐक्य यांचे सुंदर दर्शन या कार्यक्रमातून घडले.

या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित राहून आयोजकांचे कौतुक केले. महिलांना एकत्र आणणारे, त्यांच्यात आत्मविश्वास व सकारात्मक ऊर्जा निर्माण करणारे असे उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. या सुंदर उपक्रमासाठी संस्थेच्या सभासद विद्याताई तामखेडे व नाना मगदूम यांचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी मनःपूर्वक अभिनंदन करत आभार व्यक्त केले.

यावेळी प्रसार माध्यमांशी बोलताना आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, भारतीय जनता पार्टीने नेहमीच महिलांचा सन्मान राखला असून महिलांच्या सक्षमीकरणासाठी ठोस पावले उचलली आहेत. विद्याताई तामखेडे यांचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी असून त्यांचाही पक्षश्रेष्ठी योग्य सन्मान करतील, असे त्यांनी नमूद केले. उमेदवारी देण्याचा अधिकार हा पक्ष नेतृत्वाकडे असून, योग्य वेळी योग्य निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

कामोठ्यात आयोजित या कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणावर महिला आणि नागरिकांची उपस्थिती पाहायला मिळाली. समाजाच्या एकत्रीकरणासाठी आणि महिलांच्या सबलीकरणासाठी भाजपचे पदाधिकारी वर्षभर विविध उपक्रम राबवत असतात. अशा कार्यक्रमांमधून महिलांना ऊर्जा, आत्मविश्वास आणि सामाजिक सहभागाची प्रेरणा मिळते, असे मतही आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केले.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीशीने कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. विनयकुमार व श्रीमती विना कुमारी यांचे मालकीच्या फ्लॅट नं. ६१०, सहावा मजला, सी विंग, मारूती निवास, प्लॉट नं. बी-३७, सेक्टर ६, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड या मिळकतीबाबत सिडको लिमिटेड यांचेकडील दि. ३०/१२/२०१४ रोजीची सभासद हस्तांतरण परवानगी (ना हरकत) तसेच दि. २६/०३/२०१५ रोजीची सदर हस्तांतरणाबाबतची फायनल ऑर्डर या कागदपत्रांच्या मूळ प्रती दि. २४/११/२०२५ रोजी नवीन पनवेल परिसरात हरवल्या/ गहाळ झाल्या आहेत.

आमचे अशिलांनी सर्व ठिकाणी शोध घेतला परंतु त्यांना सदर कागदपत्रांच्या मूळ प्रती कोठेही सापडल्या नाहीत / आढळून आल्या नाहीत. आमचे अशिलांनी सदरील मूळ प्रती हरवले / गहाळ झालेबाबतची तक्रार खांदेश्वर पोलीस स्टेशनमध्ये दि. २२/१२/२०२५ रोजी नोंदविली असून त्याचा रजिस्टर आयडी LSvryNyMdt असा आहे. सदरील कागदपत्रांच्या मूळ प्रती त्यांनी कोणाही व्यक्तीकडे, बँकेकडे अथवा संस्थेकडे तारण, गहाण ठेवलेल्या नाहीत.

तरी सदरील कागदपत्रांच्या मूळ प्रती कोणालाही सापडल्यास त्यांनी खाली दिलेल्या पत्त्यावर अगर मोबाईल नंबरवर त्वरीत संपर्क साधावा. तसेच सदर मिळकतींवर अन्य कुणाचाही गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, कुळ वहिवाट, वापर वहिवाटीचा हक्क, इजमेंट, ताबा, बोजा चार्ज, अॅटॅचमेंट, मनाई आदेश, दंग-दावा, साठेकरार अगर अन्य कोणत्याही मार्गाने हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्तींनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत स्वतःचे हक्क हितसंबंधांविषयी सकृतदर्शनी पुराव्यासह आमच्या खालील पत्त्यावर आपल्या लेखी हरकती स्वतः अगर प्रतिनिधीमार्फत सादर करावयात किंवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. विहीत मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर सदनिका ही निर्वेध व बोजारहित आहे असे समजले जाईल व त्यानंतर आलेल्या हरकती गृहीत धरल्या जाणार नाहीत. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी, हे सर्व जाहीर व्हावे.

सही/-
**सौ.अमृता अशोक नाईक**
**(अॅडव्होकेट व नोटरी)**
**शॉप नं. ७, योगेश्वर कृपा को.ऑप. हौ.सो.. ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६, फोन नं.: ९९७५५४७२५०**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील नमुद केलेली मिळकत ही श्री. सौरभ जोमा तांडेल यांचे नांवे महसूल दप्तरी ७/१२ चे कब्जेदार सदरी आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : धानसर, ता.पनवेल, जि.रायगड**

| मालक/कब्जेदाराचे नांव | सर्व्हे नंबर | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| श्री.सौरभ जोमा तांडेल | ४६ | ०-११-०० यापैकी ०-०४-१५ | ०.२० |

मौजे धानसर, ता. पनवेल, जि. रायगड येथील वर नमुद मिळकत जमीन मालक श्री. सौरभ जोमा तांडेल यांचे मालकीचे वरील नमूद मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरुपी नोंदणीकृत खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

सदर नमुद केलेल्या जमीनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसीत करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहीवाटीचा हक्क, ताबा कब्जा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिध्द झाले पासून २१ दिवसाच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले जमीन मालक / कब्जेदार यांचे बरोबर ठरविलेला कायम खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २२/१२/२०२५

सही/-
**मयुरेश प्र. हनुमंते**
**अॅडव्होकेट-हायकोर्ट**
**शॉप नं.१०१, बी विंग, योगेश्वर कृपा बिल्डींग, प्लॉट नं.५६, ठाणा नाका रोड, प्रांत ऑफिस जवळ, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.८२८६१२१३३३**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे पिरकोन, तालुका उरण, जिल्हा रायगड, येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत ही १ ज्ञानेश्वर हरी पाटील २. बाळनाथ हरी पाटील ३. चंपा सदानंद ठाकुर ४ वनमाला प्रकाश पाटील ५. वासुदेव हरी पाटील ६. विश्वनाथ हरी पाटील ७. लता हरी पाटील यांच्या मालकीची मिळकत आहे.

**सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-**

| गावाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | पो.ख. | एकूण क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|---|---|
| पिरकोन | १८९ | १/अ/ब२ | ०.०९.३० | ०.१३.१० | ०.२२.०० | २.३६ |

नमुद केलेली मिळकत ही वरील कब्जेदारांच्या मालकी हक्कात व कब्जे वहीवाटीत आहे व त्यांनी सदरची मिळकत आमचे खरेदी देण्याबाबत वाटाघाट चालू आहे. सदरची मिळकत ही निर्वेध असल्याबद्दल विद्यमान मालकाने सांगितले आहे. सदर मिळकतीवर कसलाही कुळ, वहिवाट, ताबाकब्जा, बयाणा पावती, वचनचिट्ठी, साठकरार, खरेदीखत, गहाण, बोजा, पोटगी, चार्ज, मॉर्गेज, संपादन भाडेपट्टा, मृत्युपत्रांकीत दान, जप्ती, कर्ज, लिज तबदील, ट्रस्ट, वारसा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ०७ दिवसांच्या आत खाली सही करणार आमचे अशिलांचे वकील यांच्याकडे आपल्या हरकती खालील पत्त्यावर पोष्टाने अथवा प्रत्यक्ष संपर्क साधुन कायदेशीर पुराव्यासह लेखी स्वरुपात दाखल कराव्यात.

याप्रमाणे ठरलेल्या मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहित धरुन, तसेच त्यासंबधी कोणचेही, कोणतेही कायदेशीर हक्क, हितसंबध नाहीत व असल्यास ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहित धरण्यात येईल, तसेच मागाहुन येणारी कोणतीही हरकत अथवा परस्पर वर्तमानपत्रात घेतलेली हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. हे सर्वांस कळावे.

सदरची पेपर नोटीस देण्यात माझी कोणत्याही प्रकारची अडचण किंवा तक्रार नाही, म्हणुन मी या जाहीर नोटीसीवर सही करत आहे.

ठिकाण : उरण
दिनांक : २२/१२/२०२५

सही/-
**अॅड.स्वाती डी. कांबळे**
**अॅडव्होकेट-हायकोर्ट**

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहिर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, मौजे तुर्भे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तींच्या मालकी हक्काची, ताबेकब्जा, वहिवाटीतील तसेच त्यांचे नांवे सातबारा सदरी नोंद असलेली मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. सबब सदरहू मिळकतीचे कोणतेही नोंदणीकृत दस्त नोंदणीपूर्वी सदर मिळकतीमधील मूळ मालक यांचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहिर नोटीस प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : तुर्भे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| भोगवटादाराचे नांव | गट क्रं. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| १) कैलास भालचंद्र दवणे<br>२) विनोद भालचंद्र दवणे<br>३) रमेश गोपाळ दवणे | १४/१ | ०-१५-२०<br>पो.ख. ०-००-२०<br>एकूण क्षेत्र ०-१५-४० | २.५० |

सदरहू जागा, जमिन व सदर मिळकतीसंबंधी अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, मालकी हक्क, हितसंबंध असलेल्य व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधितांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष, तोंडी तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे, जर वरील मुदतीत कोणाकडूनही कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हितसंबंध हरकती, तकारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती/तकारी आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २२/१२/२०२५

सही/-
**अॅड. शेखर ज. खोपकर**
**पत्ता: १८ पहिला मजला, नगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाजवळ, ता. पनवेल, जि. रायगड-४१०२०६**

## जाहीर नोटीस

या नोटीसीव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे आशिल साईम झुबेरखान देशमुख, राहणार घर नं. २२५/ ए, पोस्ट लोअर तुडील, पोस्ट अप्पर तुडील, तालुका महाड, जिल्हा रायगड, यांनी खालील नमूद केलेल्या स्थावर मिळकतीचे विक्री करार हा श्री. श्यामधर शिवकरण मिश्रा, सौ. हिरावती देवी श्यामधर मिश्रा, श्री. चंद्रेश श्यामधर मिश्रा, यांचे सोबत केले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

सदनिका क्रमांक ४०३, चौथा मजला, सी विंग, मोरेश्वर हेरीटेज सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित यांसी क्षेत्रफळ ७८.३७ चौ.मी. बिल्टअप, व तळमजल्यावरील एक स्टिल्ट कार पार्किंग स्पेस क्रमांक एस पी०४, प्लॉट क्रमांक. ७०, सेक्टर क्रमांक ५, मौजे उलवे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड, ४१०२०६.

तरी कोणीही व्यक्ती तथा व्यक्तीचे किंवा आर्थिक संस्थाचे सदर मिळकती संदर्भाद कुठल्याही प्रकारचा दावा, हरकती, जसे विकी, बोजा, दान, गहाण, सरकारी, निमसरकारी, कंपनी बक्षीस, भाडेप टटा, वारसा हक्क लोन किंवा इतर की असलेस, ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसांचे आत या मिळकतीच्या संबंधित कागद पत्रासोबत माझ्या कार्यालयीन पत्त्यावर संपर्क साधावा अन्यथा सदर मिळकतीच्या विक्री व हस्तांतरणाची प्रक्रीया पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर आलेल्या कुठल्याही प्रकारच्या हरकती तकरीच्या हरकती तथा तकारीचा विचार करण्यात येणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

ठिकाण : उलवे, नवी मुंबई
दिनांक : २२/१२/२०२५

सही/-
**अॅड. तृप्ती सुर्यकांत राऊत**
**(नोटरी पब्लिक, भारत सरकार)**
**शॉप नं. १, तळमजला, महालक्ष्मी क्रिस्ट, प्लॉट नं. ३६, मालवण तडका हॉटेलच्या मागे, सेक्टर १९, उलवे, तालुका पनवेल, ४१०२०६.**
**मो.९९८७२५८७१२**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत श्री. महादेव अनंत पाटील व सुमन भास्कर गायकवाड यांच्या वडीलोपार्जित मालकी हक्क व कब्जेवहिवाटीची असून आमचे अशिलांसोबत खालील परिशिष्ट मिळकत विक्री करणेकामी बोलणी चालू असून तत्पूर्वी कोणाची काही तक्रार, हरकत असल्यास ती समजणेकामी सदर नोटीस देणेत येत आहे.

खालील परिशिष्टात मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. असा भरवसा व खात्री विद्यमान मालकाने आमचे अशिलास दिलेली आहे. तथापि, सदरील मिळकतीवर विद्यमान मालकाचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, लीन, पोटगी, अन्न, वस्त्र, कोर्टवाद, चार्ज, वाटप, दावा, वारसाहक्क, मृत्यूपत्र, वहिवाट, अदलाबदल, करार, खरेदीखत, मुखत्यारपत्र, विरोधी कब्जा अगर तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध वगैरे असल्यास संबंधितांनी सदरील नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत मूळ कागदपत्रांनिशी आमचे खालील पत्त्यावर येऊन खात्री द्यावी. सदर मुदतीमध्ये हरकत न आल्यास खालील परिशिष्टातील मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहेत. कोणाचेही कोणत्याही प्रकारचा काही एक, अधिकार व हितसंबंध नाही. असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशिल ठरलेप्रमाणे पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकत विचारात घेतली जाणार नाही.

परिशिष्ट :- तुकडी रायगड, पोटतुकडी, तालुका उरण, मे. दुय्यम निबंधक, उरण, रायगड, जिल्हा -रायगड तसेच जिल्हा परिषद रायगड, हद्दीतील गाव मौजे खोपटे (कचरेपाडा), येथील मिळकती खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | भूमापन/ सर्व्हे नं. | एकूण क्षेत्र (हे.आर.प्र.) | पोटखराबा (हे.आर.प्र.) | आकार (पैसे) |
|---|---|---|---|---|
| १ | २८/६ | ०.०३.५० | ०.००.०० | ०.६६ |
| २ | २९/३ | ०.११.०० | ०.०१.४० | ०.०१ |
| ३ | ३१/२ | ०.०२.८० | ०.००.५० | ०.१६ |

यांसी चतुःसीमा वहिवाटीप्रमाणे आहेत. येणेप्रमाणे वर्णनात्मक जमीन, जोडहक्क, अधिकार व हितसंबंधासहित दरोबस्त.

रायगड, तारीखः २३ मार्च २०२५

सही/-
**श्री. विनायक र. ताम्हणकर, वकिल**
**खरेदीदारातर्फे वकिल**
**३०२, जय आशापुरा रेसिडेन्सी, शनी नगर, मांजर्ली, बदलापूर (प.) ४२१५०३**
**भ्रमणध्वनी क्र. ८६६८५५१३१२**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीशीने कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. विनोद पांडुरंग म्हात्रे यांचे मालकीच्या फ्लॅट नं. १०४, न्यू प्रेस्टिज गार्डन को.ऑप. हौसिंग सोसायटी, पनवेल या फ्लॅटचे आमचे अशिलांचे नांवे असलेले शेअर सर्टिफिकेट क्र. २२ ची मूळ प्रत पनवेल परिसरात हरवली / गहाळ झाली आहे.

आमचे अशिलांनी सर्व ठिकाणी शोध घेतला परंतु त्यांना सदरचे शेअर सर्टिफिकेट कोठेही सापडले नाही / आढळून आले नाही. आमचे अशिलांनी सदरील मूळ प्रत हरवले / गहाळ झालेबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस स्टेशनमध्ये दि. ०५/०२/२०१६ रोजी मिसिंग दाखल क्र. ३६६/२०१६ अन्वये केली आहे. सदरील कागदपत्रांच्या मूळ प्रती त्यांनी कोणाही व्यक्तीकडे, बँकेकडे अथवा संस्थेकडे तारण, गहाण ठेवलेल्या नाहीत.

तरी सदरचे शेअर सर्टिफिकेट कोणालाही सापडल्यास त्यांनी खाली दिलेल्या पत्त्यावर अगर मोबाईल नंबरवर त्वरीत संपर्क साधावा. तसेच सदर मिळकतींवर अन्य कुणाचाही गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, कुळ वहिवाट, वापर वहिवाटीचा हक्क, इजमेंट, ताबा, बोजा चार्ज, अॅटॅचमेंट, मनाई आदेश, दंग दावा, साठेकरार अगर अन्य कोणत्याही मार्गाने हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्तींनो सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत स्वतःचे हक्क हितसंबंधांविषयी सकृतदर्शनी पुराव्यासह आमच्या खालील पत्त्यावर आपल्या लेखी हरकती स्वतः अगर प्रतिनिधीमार्फत सादर करावयात किंवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. विहीत मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर सदनिका ही निर्वेध व बोजारहित आहे असे समजले जाईल व त्यानंतर आलेल्या हरकती गृहीत धरल्या जाणार नाहीत. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी, हे सर्व जाहीर व्हावे.

सही/-
**सौ.अमृता अशोक नाईक**
**(अॅडव्होकेट व नोटरी)**
**शॉप नं. ७, योगेश्वर कृपा को.ऑप. हौ.सो.. ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६, फोन नं.: ९९७५५४७२५०**

## जाहीर नोटीस

अ. सदरिल मिळकतीचे मालक अकबर अली अब्दुल हमीद ऐनरकर यांनी आमच्या अशिल श्रीमती. माधुरी राय व गुलाब चंद्र राय, भारतीय रहिवाशी, रा. सदनिका क्र. ५०३, ट्यूलिप बिल्डिंग, प्लॉट नं. २०, जलवायू विहार, फेस-१, सेक्टर- २०, खारघर, नवी मुंबई, ताल. पनवेल, जि. रायगड-४१०२१०., ह्यांना असे दर्शविले आहे की, मौजे शिरसवणे, तालुका महाड व जिल्हा रायगड येथे खाली सविस्तर वर्णन केलेल्या परिशिष्टात त्यांच्या नावासमोर नमुद केलेल्या मिळकत, ही त्यांच्या ताबेकब्ज्यात असुन, ते सदर त्यांच्या नावासमोर नमुद केलेल्या मिळकतीस मालक म्हणुन पात्र आहेत सदर मिळकतीचे मालक, तिचा सर्व्हे नं, हिस्सा नं, क्षेत्रफळ याचे अधिक सविस्तर वर्णन खाली परिशिष्टात केलेले आहे जी आमचे अशील खरेदी करण्याचे व सदर मालक विक्री करण्याचे आपसा मध्ये ठरवले आहे.

ब. सदर खालील परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकती हया कोणत्याही वादविवाद, आक्षेप, दावा रहित पुर्णपणे निर्वेध असल्याची खात्री सदर मिळकतीचे मालक हयांनी आमच्या आशिलांना दिली असुन, त्यांनी त्यांच्या सदर मिळकती हया आमच्या आशिलांसोबत त्यांच्यात ठरलेल्या अटी व शर्तीनुसार एकत्रितरित्या विकसित करण्याचे मान्य व कबुल केले आहे.

क. तरी खालील परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकतीबाबत अथवा तिच्या हिश्श्याबाबत कोणा व्यक्तींचा अगर संस्थेचा कोणात्याही प्रकारचा हक्क वा हितसंबध, अधिकार, ताबा, दानखत, गहाणखत, भाडेपटटा, वाहिवाट, वारसाहक्क, बक्षिस, बोजा, लिज, पोटगी, फरोक्तखत इत्यादीद्वारे असल्यास किंवा करारनाम्याद्वारे सदर मिळकतीवर बांधण्यात येणा-या सदनिका, गाळे इत्यादीसंबधी काही हक्क असल्यास तसेच त्यांची हया सदरच्या व्यवहारास हरकत असल्यास सदर संबंधित इसमांनी अगर संस्थांनी त्यांच्या हरकती हया ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या कालावधीत लेखी स्वरूपात त्यासंदर्भातील सर्व प्रमाणित (सर्टीफाईड) कागदपत्राच्या पुराव्यासह खाली सही करणार हयांना अॅडवोकेट सागर आर. निकंबे, ऑफिस क्र. एस एस III, रूम नं. ४४३, सेक्टर ४, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७०९, जि. ठाणे-या पत्त्यावर कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास, सदर मिळकत निर्वेध आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकती त्यांच्या मालकांसोबत पुढील खरेदी व विक्री करण्याचे कार्यवाही सुरू करतील आणि सदर मुदतबाहय आलेल्या हरकती आमचे अशिलांनावर बंधनकारक राहणार नाहीत .

**मिळकतीचे परिशिष्ट**
**मौजे शिरसवणे, तालुका महाड, जिल्हा रायगड**
**येथिल खालील सविस्तर वर्णनित मिळकत :**

| अ. क्र. | गट नं. | क्षेत्रफळ (एच-आर-पी) | आकार (रु.पै.) | मालकांची नावे |
|---|---|---|---|---|
| १ | ३७१ | १-४२-००<br>पो.ख. ०-०९-००<br>१-५१-०० | ०.८२ | अकबर अली अब्दुल हमीद ऐनरकर (खाते क्र. ३५१). |

गट क्र.३७१ मिळकतीच्या चर्तुःसिमा :-
पूर्वेस :- गट क्रं.३७३
पश्चिमेस :- गट क्रं.३५३
दक्षिणेस :- सर्व्हे नं.३६४
उत्तरेस :- सर्व्हे नं.३४५

ठिकाण : शिरसवणे
दिनांक : २३/१२/२०२५

सही/-
**अॅड.सागर आर. निकंबे**
**ऑफिस क्र. एस एस -III, रूम नं. ४४३, सेक्टर ४, कोपरखैरणे, नवी मुंबई- ४००७०९, जि. ठाणे**
**मो: ९८७०३६२३००**

# ४० लाख लाभार्थी लाडक्या बहिणी अपात्र ठरण्याचे संकेत

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्य सरकारच्या या योजनेत सद्यस्थितीत २ कोटी ४७ लाख महिलांना या योजनेचा लाभ मिळत आहे. सध्या ई केवायसी पूर्ण करणाऱ्या महिलांची आकडेवारी ही १ कोटी ६० हजारांच्या घरात आहे. परिणामी उर्वरित ४० लाखांहून अधिकचे लाभार्थ्यांची अद्याप ई केवायसी पूर्ण केलेली नाही. त्यामुळे या लाभार्थ्यांना या योजनेतून वगळण्याबाबत निर्णय घेतला जाऊ शकतो, अशी माहिती राज्य महिला बालविकास विभागातील एका अधिकाऱ्यांकडून देण्यात आली.

महायुती सरकारसाठी गेमचेंजर ठरलेल्या लाडक्या बहीण योजनेतून लवकरच ४० लाखांहून अधिक लाभार्थ्यांवर अपात्रतेची टांगती तलवार असणार आहे. राज्य सरकारकडून या योजनेतील पात्र महिलांसाठी ३१ डिसेंबरपर्यंत ई केवायसी करणे बंधनकारक केले होते. मात्र आतापर्यंत केवळ १ लाख ६० हजार महिलांनीच ही प्रक्रिया पूर्ण केली असल्याने या योजनेतील ४० लाख लाभार्थी अपात्र होऊ शकतात, अशी माहिती राज्य महिला व बालविकास विभागातील एका वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.




राज्य सरकारने ऐन निवडणुकीच्या तोंडावर मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू केली होती. या योजनेने राज्यात विधानसभा निवडणुकीत महायुतीला मोठा फायदा झाला. त्यानंतर ही योजना नेहमीच चर्चेचा विषय ठरली होती.

या योजनेत अपात्र लाभार्थ्यांच्या संख्येसह सरकारी कर्मचाऱ्यांकडूनही या योजनेचा लाभ घेतल्याची अनेक प्रकरणे समोर आल्यानंतर राज्य महिला व बालविकास विभागाकडून या योजनेतील लाभार्थ्यांसाठी ई केवायसी सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार १८ नोव्हेंबरपर्यंत लाभार्थी महिलांना ई केवायसी पूर्ण करण्यासाठी मुदत देण्यात आली होती. मात्र राज्यात अनेक ठिकाणी उद्धवलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे आणि इतर अनेक कारणे लक्षात घेता ई केवायसीसाठी ३१ डिसेंबरपर्यंत मुदत देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला होता.

राज्य सरकारच्या वतीने या योजनेअंतर्गत देण्यात येणाऱ्या अनुदानाच्या वितरणामध्ये आचारसंहितेची कोणतीही अडचण येणार नाही. ही योजना आधीप-ासूनच सुरू असल्याने तिच्यावर कोणताही प्रतिबंध असणार नाही. आचारसंहितेचा या अनुदान वितरणाशी काहीही संबंध नसल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले आहे.

# गोवेले मानसईवाडी येथे बिबट्याने घेतला वासराचा बळी

**दै.रायगड नगरी । संतोष सुतार**

**माणगाव ।** माणगाव तालुक्यातील गोवेले मानसईवाडी येथे बिबट्याने गावात शिरून गावचे रहिवाशी चंद्रकांत महादेव मांगले यांच्या गाईच्या गोठ्यात वासरावर झडप घालून त्याला ठार मारले. त्यामुळे गावात व परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



सतत घडणाऱ्या बिबट्याच्या बळीची संख्या दिवसेंदिवस प्रत्येक तालुक्यात गावागावात वाढत चाललेली ऐकावंयास मिळत आहे. सकाळी पहाटेच्या सुमारास हि घटना घडून आलेली आहे असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. बिबट्याच्या भीतीपोटी ग्रामस्थांना घराबाहेर पडणे धोक्याचे वाटत आहे. गावांमध्ये असणाऱ्या वयस्कर मंडळीना शेतीची कामे कशी करावी याची खूपच भीती वाटत आहे.

जंगलातील बिबट्या गावात आला तर तो घरामध्ये शिरायला किती वेळ लागणार आहे या विचारानेच ग्रामस्थ चिंतातूर झालेले आहेत. या पिसाळलेल्या बिबट्याला मनुष्यहानी करण्यास किती वेळ लागणार आहे अशी चर्चा परिसरात ऐकवयाला मिळत आहे.

या सर्वांची माहिती मिळताच गोवेले गावचे पोलीस पाटील दिलीप जाधव, गोवेले ग्रामपंचायतीचे सरपंच राकेश पांचाळ तसेच वनविभाग खात्याचे वनसंरक्षक शिपाई वैभव कांबळे यांनी जागेची पाहणी करत याचा पंचनामा केला. तरीही वनविभाग खात्याने लवकरात लवकर या गंभीर प्रकरणाकडे लक्ष देऊन गावांमध्ये पिंजरा बसवून बिबट्या पासून ग्रामस्थांचे होणारे नुकसान थांबवावे अशी विनंती ग्रामस्थ करीत आहेत.

# विज्ञान प्रदर्शनात जे एम म्हात्रे चॅरिटेबल ट्रस्टच्या हिमांशू पाटील शाळेने पटकावली चॅम्पियन्स ट्रॉफी




**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिक्षण विभाग पंचायत समिती, खालापूर व तालुका गणित-विज्ञान अध्यापक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५३ वे तालुका विज्ञान प्रदर्शन, खालापूर (२०२५-२६) विकसित आणि आत्मनिर्भर भारतासाठी STEM या संकल्पनेअंतर्गत १८ व १९ डिसेंबर २०२५ रोजी पार पडलेल्या प्रदर्शनात जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था, पनवेल संचलित हिमांशु दिलीप पाटील इंग्रजी माध्यम शाळा, खालापूर यांनी गणित आणि विज्ञान या विषयांमध्ये उत्कृष्ट सादरीकरण केल्यामुळे विज्ञान प्रदर्शनामधील चॅम्पियन्स ट्रॉफी मिळवली.

संदिप कराड, गटविकास अधिकारी पं. स. खालापूर, दीपा परब-गवस, गटशिक्षणाधिकारी पं. स. खालापूर, शिल्पा पवार-दास वरिष्ठ विस्तार अधिकारी पं.स.खालापूर, जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या ममता प्रितम म्हात्रे व सुनीता दिलीप पाटील या प्रमुख मान्यवर म्हणून बक्षीस समारंभासाठी उपस्थित होत्या. या प्रसंगी प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे कौतुक केले. संस्थेचे अध्यक्ष म्हणून या यशाचा अभिमान असल्याचे माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी म्हटले आहे.

## पनवेल महानगरपालिका आणि रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल यांच्या संयुक्त विद्यमाने

# 'एक धाव मतदानासाठी' महिलांच्या भव्य मॅरेथॉनचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिका आणि रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल यांच्या संयुक्त विद्यमाने मतदार जनजागृतीसाठी 'एक धाव मतदानासाठी' या संकल्पनेवर आधारित महिलांची भव्य मॅरेथॉन आज रविवार दि.२१ डिसेंबर रोजी वडाळे तलाव, पनवेल येथे आयोजित करण्यात आली.




लोकशाही बळकट करण्यासाठी महिलांचा सक्रिय सहभाग वाढावा, मतदानाबाबत जनजागृती व्हावी, या उद्देशाने या मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले होते.

निवडणूक अधिकारी तथा आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार मतदान जनजागृतीसाठी महापालिकेच्या वतीने स्वीप कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या या मॅरेथॉनला वडाळे तलाव परिसरातून सकाळी ६ वाजता सुरुवात करण्यात आली. ही मॅरेथॉन ३ किमी आणि ५ किमी अशा दोन गटांमध्ये घेण्यात आली. शहरातील तसेच परिसरातील विविध वयोगटातील महिलांनी उत्स्फूर्तपणे मोठ्या संख्येने या मॅरेथॉन सहभागी नोंदविला.

नागरिकांमध्ये मतदानाबाबत जागरूकता निर्माण करणे, लोकशाही प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढवणे हे स्वीप उपक्रमामागील मुख्य उद्दिष्ट आहे. या मॅरेथॉनच्या माध्यमातून महिलांनी आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश दिलाच त्याचबरोबरीने महिलांनी स्वतः मतदान करावे, शिवाय कुटुंबातील व परिसरातील नागरिकांनाही मतदानासाठी प्रेरित करण्याचा संदेश दिला.

महापालिका अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, उपायुक्त डॉ.वैभव विधाते यांच्यासह रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलचे मार्गदर्शक डॉ. गिरीश गुणे आणि प्रेसिडेंट अनिल ठकेकर आदि मान्यवरांच्या यांच्या हस्ते यावेळी मॅरेथॉन यशस्वीपणे पुर्ण केलेल्या महिलांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

स्वीप अंतर्गत घेण्यात आलेल्या या उपक्रमांतर्गत कार्यक्रम स्थळी महापालिकेच्या वतीने खास आकर्षक सेल्फी पॉईंटची सुविधा करण्यात आली होती. मतदान जनजागृतीसाठी बनविण्यात आलेला खास मास्कॉट या सेल्फी पॉईंटवरती ठेवण्यात आला होता.

# पक्षाला सन्मानाची वागणूक देईल त्याच पक्षाला पाठींबा देणार : महेश साळुंखे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली पक्षाच्या प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक महेश साळुंखे यांच्या निवासस्थानी संपन्न झाली. या बैठकीमध्ये पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये कोणाला पाठिंबा द्यायचा याविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यावेळी पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांनी महेश साळुंखे यांना पाठिंबा देण्याबाबतचे सर्व अधिकार दिलेले आहेत. पक्षाच्या कार्यकर्त्यांनी अशीही मागणी केलेली आहे की महायुती किंवा महाविकास आघाडी यांच्यापैकी जो आपल्या पक्षाला सन्मानाची वागणूक देईल त्याच पक्षाला पाठिंबा देण्यात यावा अन्यथा अपक्ष उमेदवारांना पाठिंबा देण्यात यावा.



पनवेल महानगरपालिकेच्या २० वार्डांपैकी १८, १९, २० या वार्डांमध्ये पक्षाची चांगल्या प्रकारची ताकद आहे आणि ही ताकद उमेदवार निवडून आणण्याकरिता निर्णायक मतदार ठरू शकतात. त्याचप्रमाणे कामोठे विभाग , खांदा कॉलनी, नवीन पनवेल , कळंबोली या ठिकाणी सुद्धा पक्षाची चांगल्या प्रकारची ताकद आहे. जर पक्षाच्या कार्यकर्त्यांना या निवडणुकीमध्ये सन्मानाची वागणूक मिळाली नाही तर पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष म्हणून महेश साळुंखे जो निर्णय घेतील तो पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांना मान्य राहणार आहे अशी ग्वाही सर्व कार्यकर्त्यांनी दिलेली आहे.

लवकरच महायुती किंवा महाविकास आघाडी यांच्यापैकी कोणाला पाठिंबा द्यायचा याविषयी दोन्ही गटाच्या वरिष्ठांशी महेश साळुंखे चर्चा करत आहेत आणि लवकरच कोणाला पाठिंबा द्यायचा याविषयी निर्णय साळुंखे जाहीर करतील.

या बैठकीमध्ये . अध्यक्ष, पनवेल विधानसभा मतदारसंघ.निलेश कांबळे, अध्यक्ष, पनवेल तालुका दिलीप नाईक, उपाध्यक्ष पनवेल तालुका नरेश परदेशी ,अध्यक्ष पनवेल शहर मनोज कांबळे अध्यक्ष नवीन पनवेल विभाग किशोर कदम, अध्यक्ष कामोठे शहर विभाग अरुण जाधव ,अध्यक्ष महिला आघाडी पनवेल शहर ममताज पठाण,उपाध्यक्ष पनवेल शहर भारत दा-ताड ,अध्यक्ष अल्पसंख्यांक सेल पनवेल शहर आसिफ शेख ,उपाध्यक्ष महिला आघाडी पनवेल शहर निशा कोळी ,संघटक पनवेल शहर समाधान कांबळे ,उपाध्यक्ष नवीन पनवेल विभाग अशोक कदम ,सरचिटणीस पनवेल शहर मयूर गायकवाड ,संघटक पनवेल तालुका चंद्रकांत वेळासकर, उपाध्यक्ष पनवेल विधानसभा मतदारसंघ प्रशांत सोनवणे ,संघटक पनवेल विधानसभा मतदारसंघ अनिल वामने व महिला आघाडीच्या सुमन पाटील व फातिमा या उपस्थित होत्या.

# सर्वात मोठे गुरु आपले जीवन तर सर्वात मोठा शिक्षक जीवनातील अनुभव : डॉ. श्रुती गोडबोले

**दै.रायगड नगरी । कर्जत**

'भारतीय संस्कृती, कला आणि विद्या याची समृद्ध परंपरा आहे. ती आपण आत्मसात केली पाहिजे. तीचे आपण जतन केले पाहिजे. त्याच्यामध्ये आणखीन भर घालून ती समृद्ध केली पाहिजे. आपल्याला आयुष्यात येणारी संकटे, अडचणी किंवा दुःखाचा, अज्ञानाचा अंधःकार आहे. त्याचा नाश करण्यासाठी विद्येची, शिक्षणाची गरज आहे. 'शिक्षण हे असे अस्त्र आहे की त्यामुळे आपण जग बदलू शकतो.' असे नेल्सन मंडेला यांनी सांगितले आहे.



तर अब्दुल कलाम यांनी सांगितले आहे. 'आपण यशस्वी माणसांच्या कथा वाचता त्याचबरोबर अपयशी माणसांच्या कथा वाचल्यास त्यातून यशस्वी होण्यासाठी नवीन मार्ग मिळतील.' दररोज स्वतःशी नव्याने स्पर्धा करा. आपली पहिली गुरु आपली आई, त्यानंतर शिक्षक आणि पुस्तके गुरु असतात. सर्वात मोठे गुरु आपले जीवन आहे. आणि अनुभव हे आपले शिक्षक आहेत.' नवीन स्वप्न आणि उद्धीष्ठ ठरावा व यश मिळवा. असा महत्वपूर्ण सल्ला सामाजिक कार्यकर्त्या डॉ. श्रुती गोडबोले यांनी विद्यार्थ्यांना दिला.

कर्जत मधील महिला मंडळ संचलित विद्या विकास मंदिर शाळेच्या दोन दिवसांच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन शाळेच्या प्रांगणात करण्यात आले होते. प्रमुख पाहुण्या डॉ. श्रुती गोडबोले यांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीप प्रज्वलन करून स्नेहसंमेलनाचे उदघाट्न करण्यात आले. याप्रसंगी योगेश गोडबोल, महिला मंडळाच्या अध्यक्ष उषाताई भट, कार्याध्यक्ष मीना प्रभावळकर, उपाध्यक्ष वैदेही पुरोहित, मुख्याध्यापिका स्नेहा गाढे आदी उपस्थित होते.

कार्याध्यक्ष प्रभावळकर यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रस्ताविकात शाळेचा चढता आलेख सादर केला. पाहुण्यांचा परिचय सुप्रिया भासे यांनी करून दिला. त्यानंतर दहावी शालांत परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या पहिल्या पाच विद्यार्थ्यांचा तसेच विविध क्षेत्रात यश मिळविलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा व शिक्षीकांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. त्यानंतर विद्यार्थ्यांनी नृत्य, गीते सादर करून आपली कला प्रदर्शीत केली. दुसऱ्या दिवशी वास्तुविशरद राहुल अगज, विजया हांडे या प्रमुख म्हणून उपस्थित होत्या. या प्रमुख पाहुण्यांनी, विद्यार्थ्यांना शिक्षणाविषयी चे महत्व तसेच पालकांना व शिक्षकांना त्यांना घडविण्यासाठीचे मार्गदर्शन करण्यासाठी प्रेरित केले. त्यानंतर मान्यवरांच्या विद्यार्थ्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. सूत्रसंचालन श्रद्धा मुंढेकर तर आभारप्रदर्शन स्नेहा गाढे यांनी केले.

याप्रसंगी डॉ. माधवी ठाकूर देसाई, संगीता गोडबोले, माणिक हरपुडे , सरिता मंडावळे, पूजा सुळे, प्रेमा पितळे, मेघा पिंगळे आरती कोकरे ,माधुरी देशमुख, वृषाली माळी, शारदा राठोड, सुषमा सुपे, सारिका देशमुख, अर्चना भुसाळ, सुमिता अहिरराव, दया मोडक, प्रियांका शिंदे, आदी उपस्थित होते.

# दत्ताराम शिर्के यांची पेण प्राथमिक शिक्षक पतपेढीच्या व्हाईस चेअरमनपदी निवड

**दै.रायगड नगरी । माणगाव**

माणगाव तालुक्यातील प्राथमिक शिक्षक दत्ताराम अर्जुन शिर्के यांची पेण प्राथमिक शिक्षक पतपेढीच्या व्हाईस चेअरमन पदी बिनविरोध निवड झाली असुन अनेक दिग्गजांनी त्यांचे तोंड भरून कौतुक केले आहे.

काही महिन्यांपूर्वी दत्ताराम शिर्के यांनी पोटनिवडणुकीत विजय मिळवून संचालक पद मिळवले होते. शिक्षकांप्रती असणारी तळमळ,कामाची पद्धत, शिक्षकांशी असणारे संबंध, अडीअडचणीला उपयोगी पडणारी त्यांची वृत्ती आणि शिक्षकांचे प्रश्न सोडवण्याचे त्यांचे कौशल्य या जोरावर ते एवढ्या मोठ्या पतपेढीवर व्हाईस चेअरमन झाले आहेत असे सर्व स्तरातून बोलले जात आहे.

त्यांच्या या यशाबद्दल पॅनल प्रमुख तथा अखिल प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष सोपान चांदे, सरचिटणीस विनोद जोशी,मा.चेअरमन मोहन पाटील, सुमित्रा खेडेकर व सर्व संचालक मंडळ यांनी सहकार्य केले आहे.त्यांना प्रमोद पाटील, प्रसाद म्हात्रे, देवानंद पिंगळे,अजय कापसे, सुभाष भोपी, विजय येलवे,नरेश सावंत, रवींद्र पाटील, सुहास चांदोरकर तसेच रायगड जिल्ह्यातील अनेक शिक्षक बंधू भगिनी व शिक्षक मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

